वर्ष १६ वे

अंक १ ला

दुसऱ्यांचे परीक्षण त्यांच्या गुणासाठी करा!
आणि आत्मपरीक्षण दुर्गुणासाठी करा!




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

### नियोजित वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट)
- राहिलेल्या बांधकामाचा अपेक्षित खर्च रु.७० लक्ष
- प्रत्येक मजल्यावर विद्यार्थ्यांसाठी ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**डिसेंबर २०१५**
**जाने.-फेब्रु.-मार्च २०१६**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११,००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

- **तळमजला व दोन मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये ८० विद्यार्थी राहात आहेत.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

यावेळचा अंक आपल्या हाती देताना थोडा उशीर झालेला आहे त्याबद्दल दिलगीरी व्यक्त करतो.

दि.१६ ऑगस्ट २०१५ रोजी डॉ.आंबेडकर भवनामध्ये झालेल्या स्नेहमेळावा तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव सोहळ्यामध्ये आपल्याला आपल्या तालुक्याचे **आमदार विजयराव औटी व डॉ.अशोक वाली** यांच्याशी हितगुज करता आली. **प्रा.सुनील राजे निंबाळकरांच्या** रूपाने एक चांगला वक्ताही आपल्याला **'हिरा'** म्हणून मिळाला. तथापि, नेहमी ज्या संख्येने पारनेरकर मंडळी या कार्यक्रमास येतात ती संख्या यावेळी कमी झालेली दिसली. सर्व सभासदांनी व हितचिंतकांनी मंडळांच्या कार्यकारणी सदस्यांवर जो विश्वास टाकला आहे तो सार्थ ठरविण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत असे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

श्री.हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली मंडळाचे काम अतिशय चांगले चाललेले असून सभासद व हितचिंतक ज्या पद्धतीने देणग्या देत आहेत, त्यावरून त्यांचा मंडळावर विश्वास आहे, असे दिसते. त्यामुळे मंडळाच्या कामकाजाबद्दल मी समाधान व्यक्त करतो. आजमितीस मंडळाकडे **रू. ६० लक्ष** देणग्यांच्या स्वरूपात जमा आहे. मंडळ आता आपल्या **विद्यार्थी वसतिगृहाचे प्रस्तावित तिसऱ्या व चौथ्या मजल्याचे बांधकाम सुरू करण्याच्या टप्प्यात आहे. बांधकामासाठी अधिक आर्थिक निधीची आवश्यकता असल्याने रू.१ लक्ष देणगी देणारे देणगीदार मिळविण्याबाबत मी आपणास सर्वांना आवाहन करतो.**

यावर्षी पाण्याच टंचाई लवकरच भासेल अशी चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे आपल्याला आपल्या पारनेर तालुक्यामध्ये मदत करण्याची वेळ येईल असे वाटते. सदर बाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या कृपया पाठवाव्यात. आपल्या सुचना व मार्गदर्शनाच्या आम्ही प्रतिक्षेत आहोत.

**'कर्तृत्व पारनेरकरांचे'** या सदरासाठी आपणाकडून लेख मिळण्याची अपेक्षा आहे. श्री.हौसाराम घोडके यांनी वाढदिवसानिमित्त आपल्या व आपल्या कौटुंबियाकडून किमान **रू.१०००/-** देणग्या गोळा करण्याच्या योजनेस आपण देत असलेल्या प्रतिसादाप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

अद्यापही महिला वसतिगृहासाठी जागा मिळालेली नाही, याची मी मुद्दाम आठवण करून देत आहे. त्यासाठी दानशूर मंडळींच्या आम्ही प्रतिक्षेत असून त्याबाबत आपणाकडून शिफारशींची अपेक्षा ठेवून संपादकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ। जय शिवराय।।

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

**सभासद, हितचिंतक व देणगीदार यांना**

# नववर्ष २०१६

**सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !**

# वसतिगृह प्रवेश

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे चे सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे सुरु झाले असून प्रवेशासाठी खालील पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**श्री.संजय जंगम - मो. ९४२३०२२१२३, ७०४०५७००६२**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर तालुका मित्र मंडळाचा वार्षिक स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम तसेच वार्षिक सर्वसाधारण सभा दि.१६.०८.२०१५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मालधक्का चौक, पुणे येथे सकाळी १०.०० ते २.०० या वेळात संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमास सुरूवात झाली.

प्रास्ताविकामध्ये प्रा.सुनील राजेनिंबाळकर यांनी मंडळाच्या आतापर्यंतच्या कामकाजाचा आढावा घेतला. १९८० पासूनचा मंडळाचा इतिहास मराठी भाषेचे गाढे अभ्यासक असलेल्या सरांनी खास अलंकारीक शैलीत केलेल्या प्रस्तावनेने कामकाजाचा नूरच एकदम पालटला गेला.

या प्रसंगी मान्यवरांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. **आमदार विजयराव औटी यांचा इंजि. विजयकुमार ठुबे** यांच्या शुभहस्ते तर **डॉ.अशोकजी वाली** सरांना **श्री.हौसारामजी घोडके** यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय **श्री. गिरीश गांधी** यांनी व अध्यक्षांचा परिचय **इंजि.विजयकुमार ठुबे** यांनी करून दिला.

त्यानंतर ग्रामस्थांचा सत्कार **आमदार विजयराव औटी** यांच्या हस्ते झाला. सदर यादीचे वाचन **प्रा. सुनील राजे निंबाळकर** यांनी केले. १०वीच्या सत्कारार्थी विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन **प्रा.गोरक्ष जगताप** तर १२वीच्या गुणवंत विद्यार्थी तसेच पदवीका गुणवंत विद्यार्थी यादीचे वाचन **प्रा.माधवराव गायके** यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना **श्री.सुनील तोटे यांनी मंडळाची संख्यात्मक माहिती सांगून पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेबसाईटचा वापर करावा असे आवाहन केले. श्री.भास्करराव घोडके** सर यांनी मंडळाच्या कार्यासंबंधी जवळून माहिती असल्याचे सांगून दरवर्षी **रु.५०००** देणगी देण्याचे आश्वासन दिले आहे. **श्री.विलासराव शेळके** हे सह्याद्री हॉस्पिटलमध्ये कार्यरत असून वैद्यकीय स्वरूपाच्या काही समस्या असल्यास आर्जवून मदत करील असे सांगितले. विद्यार्थी **ऋषीकेश धामणे** याने आज आम्ही शिक्षण घेत आहोत, पण मोठे झाल्यावर जाणीवपूर्वक आठवणीने जरूर पारनेर तालुका मित्र मंडळास मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करू असे मोजक्या शब्दात मनोगत व्यक्त केले.

**डॉ.अशोक वाली, प्रमुख पाहुणे** यांच्या




स्नेहमेळाव्या प्रसंगी मार्गदर्शन करताना १) इंजि.विजयकुमार ठुबे, २) प्रा.सुनिलराजे निंबाळकर, ३) डॉ.अशोक वाली, ४) मा.आमदार विजयराव औटी




मा.विजयराव औटी यांचा सत्कार करताना मा.इंजि.विजयकुमार दुबे, सोबत अध्यक्ष हौसाराम घोडके व कार्यवाह बाजीराव जगदाळे



कु.स्नेहल सुनील पोटे हिचा सत्कार करताना मंडळाचे उपाध्यक्ष श्री.मधुकर शिरोळे, सोबत सौ. व श्री.सुनील पोटे

भाषणातून कोल्हापूरच्या माणसाचा मेंदू कुठे असतो? अशी प्रश्नार्थक सुरूवात करून विद्वत्तेची केवळ पुण्याची मक्तेदारी नाही हे अत्यंत अभ्यासपूर्ण भाषणातून दाखवून दिले. आयुर्वेदाचे जीवनातील महत्व विषद करताना आयुर्वेद म्हणजे केवळ झाडपाल्याचे औषध नाही तर आयु = आयुष्य व वेद = ज्ञान असे समीकरण पटवून दिले. जन्म व मरण यातील काळ म्हणजे आयुष्य. कोणाचे २०-३५-४०-५०-७०-१०० वर्षे असू शकते. परंतू सध्या फक्त सरासरी ५८ वर्षे आयुर्मान असल्याचेही सांगितले. विज्ञानाने प्रगती केली पण लाईफ स्टाईल वाढविली नाही असे सांगितले. **घड्याळाचे भान ठेवणारे आयुर्वेद निसर्गाचा विचार करते. आयुर्वेद आकृती, प्रकृती, निष्कृती व निसर्गावर अवलंबून आहे.** सकाळी ब्रह्ममुहुर्तावर उठावे. तशी सवय लावावी व त्यामुळे बद्धकोष्टता नाहीशी होईल. शरीराला तेलाने मॉलीश करणे फायद्याचे आहे असे त्यांनी सांगितले. सणावारांचे महत्व जाणुनघेवून त्या त्या ऋतूमध्ये ती फळे व आहार घ्यावा. साजुक तुपामुळे कोलेस्टोरॉल (चरबी) वाढते ही संकल्पनाच आयुर्वेदाला पटत नाही. मॅगी, पिझ्झा, पावभाजीत कोणते जीवनसत्व आहे ? **सध्या मांसाहार वाढला आहे. पण ते जड व उष्ण खाणे आरोग्यास चांगले नाही.** विरूद्ध आहार म्हणजेच दुध+मासे, किंवा दुध+फळे असे खाणे योग्य नाही. जे जेथे पिकते ते तेथे खावे असे त्यांनी आर्जवून सांगितले. ३६५० वनस्पतींचा उल्लेख करून आहार विहार व व्यायाम करता आला पाहिजे.

**''देवाने दिलेली शरीररूपी गाडी किती पळते त्यावर आवश्यक तेवढेच पेट्रोल (खाणे) टाकावे''** आजकाल खाणे खुप वाढले व शारीरीक कष्टाचे काम कमी व बैठे काम जास्त त्यामुळेच तब्बेतीच्या तक्रारी वाढल्या आहे. पुर्वीच्या स्त्रीयांच्या ताकद व आताच्या स्त्रीयांच्या ताकदीची



स्वामी समर्थ बँकेचे अध्यक्ष मा.अशोकराव शेळके यांचा सत्कार करताना आमदार विजयराव औटी व डॉ.अशोक वाली.




प्रा.दत्तात्रय दौलतराव पठारे यांना पी.एच.डी. मिळाल्याबद्दल सत्कार करताना आमदार विजयराव औटी व डॉ.अशोक वाली.




डॉ.अशोक वाली यांनी त्यांचे 'ह्रदय' हे पुस्तक आमदार विजयराव औटी यांना भेट देताना

तुलना करताना पूर्वी सहजपणे बाळंतपण होत असे व निखाऱ्याचा शेक देत असत. आताची बाळंतपणे एअरकंडीशन रूममध्ये होतात.

मनावर संयम, ताबा, सहनशीलता, शक्तीसंचय, मनाचा खूप मोठा विचार व श्रद्धा पाहिजे. **स्वामी विवेकानंद म्हणत ''३३ कोटी देवावर श्रद्धा असून उपयोग नाही, तर तुमचा तुमच्यावर विश्वास पाहिजे, तरच दीर्घायुषी बनता येऊ शकेल.''**

कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार विजयराव औटी यांनी सुरुवातीस सांगितले की, मला शक्यतो कुणी अध्यक्ष करत नाही. कारण मी अनेक कामांमुळे शेवटपर्यंत थांबत नाही. अध्यक्षाला शेवटपर्यंत बसावे लागते. मी काम झाले की, लगेच दुसऱ्या कामाला जातो. **जेथे जेथे पारनेर वासियांच्या संस्था आहेत तेथे तेथे मी अवश्य जातो.** समाजबांधवांना भेटावे, मातृभूमी ऋण फेडण्यासाठी तुम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना दाद द्यावी. केवळ स्वतःची बायको, मुले अशा चौकोनी कुटुंबाचा



कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ.अशोक वाली यांचा सत्कार करताना अध्यक्ष मा.हौसाराम घोडके

समाजबांधवांना काय उपयोग! **''ज्याप्रमाणे १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीला आपण फक्त भारतीयच असतो तसेच एक दिवस (ज्या दिवशी स्नेहमेळावा असेल तेव्हा) फक्त पारनेरकरच असतो.''** हे मंडळ एक व्यक्ती नसून एक शक्ती आहे. आता मी विरोधी पक्षात नसून सत्ताधारी पक्षात आहे. मा.मुख्यमंत्र्यांच्याकडून निश्चितपणे निधी उपलब्ध करून देईन असे आश्वासन त्यांनी दिले. मंडळाचे ७३ वर्षांचे अध्यक्ष

पान क्र.१० वर....



मा.विजयराव औटी यांचेकडून सत्कार स्विकारताना माहिती अधिकार कार्यकर्ते श्री.सुनील तोटे व सौ.सोनल तोटे.



स्नेहमेळाव्याप्रसंगी उपस्थित
पारनेर तालुका मित्र मंडळाचे सभासद, विद्यार्थी व हितचिंतक.

# पारनेर परिवार मित्र मंडळ, अहमदनगर वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेहमेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम वृत्तांत

पारनेर परिवार मित्र मंडळ, अहमदनगर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा, विद्यार्थी व गुणवंतांचा सत्कार समारंभ तसेच समाजभूषण या पुरस्काराचे वितरण दि.२३.०७.२०१५ रोजी हमाल पंचायत भवन अहमदनगर येथे मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी नगरसेवक **श्री.ज्ञानदेव पांडुळे** (जे मंत्री या नावाने परिसरात परिचीत आहेत) होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवाराचे अध्यक्ष **श्री.तारकराम झावरे** यांनी केले. त्यांनी सांगितले की नगर शहरामध्ये पारनेर तालुक्यातील असंख्य रहिवासी असून ते विविध क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या कर्तृत्वामुळे ते पारनेर तालुक्याचे नाव उज्वल करीत आहेत. अहमदनगर शहराच्या सामाजिक, राजकिय धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात अनेकांनी आपली दखल घ्यावी असा ठसा उमटविला आहे. या क्षेत्रातील मान्यवरांचे कार्य लक्षात घेऊन आम्ही **पारनेर भूषण या पुरस्काराने सन्मानीत करण्याकरीता अहमदनगर महानगर पालिकेचे महापौर श्री.अभिषेक कळमकर तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी महापौर श्री.शंकरराव घुले यांची निवड केली असे नमूद केले.** तसेच मंडळाने केलेल्या कामाचे मूल्यमापन करून मंडळास आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.ज्ञानदेव पांडुळे व परिवाराचे अध्यक्ष श्री.तारकराम झावरे यांच्या हस्ते **महापौर अभिषेक कळमकर व हमाल पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शंकरराव घुले यांना पारनेर भूषण पुरस्काराने टाळयांच्या गजरात सन्मानीत करण्यात आले.**

यावेळी विविध क्षेत्रात कामगिरी केलेल्या व्यक्तींचा, विद्यार्थ्यांचा तसेच युपीएससी मध्ये उत्तीर्ण झालेल्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. युपीएससी मध्ये उत्तीर्ण झालेल्या राहुल कर्डीले याने विद्यार्थ्यांना अचूक मार्गदर्शन केले. सत्कारास उत्तर देताना मा.शंकरराव घुले म्हणाले की, आमच्या कार्याची दखल घेवून पारनेर वासियांनी आमचा जो गौरव केला तो कायम स्मरणात राहील. नगरमध्ये पारनेरकरांसाठी विविध योजना व त्यांच्या अडीअडचणी दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करून असे आश्वासन दिले. **महापौर अभिषेक कळमकर यांनी पारनेर परिवार मित्र मंडळाच्या कार्याचे कौतुक करून हे मंडळ असेच वर्धिष्णु व्हावे अशा शुभेच्छा दिल्या. तसेच भविष्यात सर्व प्रकारचे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.**

या प्रसंगी शिक्षणाधिकारी सौ.सुनंदा ठुबे, इंजि.अनिल साळुंके, संजय खामकर, बापु बढे, बंटी गुंजाळ, डॉ.मोटे, इंजि.दत्तात्रय शेळके, सदानंद सोनवणे, संपतराव येणारे, संजय दुधाडे, सुरेश थोरात, सुरेश खरपुडे, विष्णु म्हस्के, गणेश भगत, आबा लोंढे, नगरसेवक विपुल सेठीया, ठुबे बाबा, कुलथे बाबा, बाबा आरगडे, प्रा.अभय जामगावकर, प्रा.पायमोडे, गायके नाना, प्रा.दळवी आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व अहमदनगर परिसरातील पारनेर वासीय आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.संजय दुधाडे व सुरेश थोरात, आभार संपतराव येणारे व स्वागत श्री.सदानंद सोनवणे यांनी केले.

**शब्दांकन - तारकराम झावरे.**



पारनेर परिवार मित्र मंडळाच्यावतीने नगरचे महापौर अभिषेक कळमकर व हमाल पंचायतचे जिल्हाध्यक्ष शंकरराव घुले यांना पारनेर भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी परिवारचे अध्यक्ष तारकराम झावरे, ज्ञानदेव पांडूळे, शिक्षणाधिकारी सुनंद ठुबे, इंजि.अनिल साळुंके, संजय खामकर, बापू बडे, बंटी गुंजाळ, डॉ.मोटे, इंजि.दत्तात्रय शेळके, सदानंद सोनवणे, संपतराव येणारे, संजय दुधाडे, सुरेश थोरात, सुरेश खरपुडे, विष्णू म्हस्के, गणेश भगत आदि.

# विद्यार्थी अभिनंदन - दहावी

ऋषीकेश श्रीकांत वाखारे, रा.पानोली ९५%



कु.श्रुती प्रविण काळोखे, रा.पानोली - ९३%

मयुर सुभाष लोंढे, रा.कान्हुर पठार - ८९%



कु.निकीता संदीपकुमार पवार, रा.सुपे - ८५%

नयन मधुकर चौधरी, रा.वडझिरे - ८०.५%

आकाश आप्पा-साहेब हरेल, रा. हिवरे ७९.५%

**बारावी वाणिज्य** →



हर्षल अजित जेऊरकर, रा.पारनेर - ६२%

**बारावी सायन्स** →



कु.काजल शंकर बर्वे, रा.वासुंदे - ८६%

**पुर्व माध्य. शिष्यवृत्ती** →



कु.सौम्या सचिन लोढा, रा.काळकुप माळकुप

३०० पैकी २८४ मार्क्स
पुणे शहर विभागात
चौथा क्रमांक
राज्य शहर विभागात
सहावा क्रमांक

# वेगळ्या वाटा...



**कु.धनश्री भास्कर चेमटे,** रा.वासुंदे ही **भास्कर बाबुराव चेमटे,** उपमंडळ अभियंता, बी.एस.एन.एल. अहमदनगर यांची कन्या असून ती **भारतीय विज्ञान शिक्षा एवं अनुसंधान संस्थान भोपाळ** (IISER, Bhopal) येथे एम. एस. फिजीक्स या शाखेत शिकत असून पुढे तिचा नॅनो फिजीक्समधून संशोधन क्षेत्रातील पी.एच्.डी. आणि पोस्ट डॉक्टरल करण्याचा मानस आहे. **ही संस्था मानव साधन एवं विकास भारत सरकार यांच्या अधिपत्याखाली स्थापन झालेली आहे.**

संशोधन क्षेत्रात बुद्धीमान विद्यार्थी यावेत म्हणून हा उपक्रम केंद्र सरकारने सुरू केला असून याच्या शाखा भोपाळ, चंदीगड (मोहाली), कलकत्ता, पुणे, त्रिवेंद्रम व तिरुपती येथे कार्यरत आहेत. येथे प्रवेश मिळविण्यासाठी जे.ई.ई.ॲडव्हान्स परीक्षा पास होणे आवश्यक आहे. बारावी विज्ञान बोर्ड परीक्षेत इन्स्पायर स्कॉलरशिप प्राप्त झालेल्यांना आयशरच्या पात्रता स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण व्हावे लागते. येथे प्रवेश मिळणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना **दरमहा रू.५०००/- स्कॉलरशिप** मिळते. तसेच **संशोधनात काम करण्यासाठी वर्षात रू.२०,०००/- मिळतात.** या उन्हाळ्यातील अवकाश कालावधीत कु.धनश्री व कु.अनघा या दोन विद्यार्थीनींची अवकाश क्षेत्रातील इस्त्रोचे अभियांत्रिकी महाविद्यालय, त्रिवेंद्रम येथे डॉ.उमेश कढाणे यांच्या मार्गदर्शनाखाली **Automatic & Molucular Physics** या प्रोजेक्टवर कार्य करण्यासाठी निवड झाली. या प्रोजेक्टवर त्यांनी ५५ दिवस यशस्वीरित्या काम केले. तिच्या यशाच्या या शिरपेचात ''राणी लक्ष्मीबाई मुलींची सैनिक शाळा, कासार अंबोली, ता.मुळशी, जि.पुणे'' या शाळेचे विशेष योगदान आहे.

शिक्षण क्षेत्रात केरळ राज्याचा नावलौकिक सर्वश्रेष्ठ आहे. भारत सरकारच्या अखत्यारीतील श्रेष्ठ संस्थेत अंदाजे ४० टक्के प्रवेश मिळतात. **महाराष्ट्रातील मुलामुलींनी याच कित्ता गिरवावा म्हणून हा अल्पसा प्रयत्न!**


Nath ELEVATORS

# नाथ एलिव्हेटर्स

**इमारतींच्या लिफ्टचे मॅन्युफॅक्चरर्स**

- **Manufacturer of Elevators,**
- **Installation Commissioning &**
- **Maintenance of all type of Lifts.**

**Prop. : Y.D.Bhusare Patil**
**Cell : 9890909945**
**9552528284**

S.No.4/1+2, Narsiha Colony, Next to Balaji Law College, Thathwade, Pune - 411033.
Tel. : (O) 020-65104322 E-mail : nath.elevatorspune@gmail.com

# अभिनंदन



❊ सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती **श्री.प्रकाश बबनराव सोमवंशी,** रा.जवळे यांची पिंपरी चिंचवड महानगर पालिकेवर **‘स्विकृत नगरसेवक’** म्हणून निवड झाली.

❊ सामाजिक कार्यकर्ते **श्री.शिवलिंग दिगंबर जेऊरकर,** रा.पारनेर यांची **श्रीमती भिकुबाई मेनकुदळे पंचम लिंगायत संस्थेवर २०१५ ते २०१८ या कालावधीसाठी विश्वस्त** म्हणून बिनविरोध निवड झाली. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **सौ.रजनी अरूण नरसाळे,** रा.गोरेगाव या पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळात कार्यरत असून त्यांना **मुख्याध्यापीका म्हणून पदोन्नती मिळाली.** यापूर्वीसुद्धा त्यांना पुणे महानगर-पालिकेने **‘आदर्श शिक्षिका’** पुरस्काराने सन्मानीत केले होते. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री.शहाजी बाळासाहेब गायकवाड,** रा. रुई छत्रपती यांची महाराष्ट्र शासनाच्या साखर आयुक्त कार्यालयाने नियुक्त केलेल्या कार्यकारी संचालकांच्या **पॅनेलवर निवड** झालेली आहे. त्यांची **दौंड शुगर कं.प्रा.लि. चे पुर्णवेळ संचालक** म्हणून नेमणूक झाली आहे.



❊ **डॉ.बाळासाहेब बांडे** यांची सुकन्या **कु.ऋतुजा बांडे,** बी.ई.सिव्हील हिने तिच्या **पहिल्या पगारातून मंडळास रू.१००००/- देणगी दिली.** तसेच तिने **आम्ही टाकळीकर या संस्थेस सुद्धा रू.१००००/- देणगी दिली** आहे. त्यानिमित्त तिचा आमदार विजयराव औटी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.



❊ **एम. आय. टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाफारे यांना ‘ग्लोबल टीचर रोल मॉडेल’** हा पुरस्कार नुकताच अरूणाचल प्रदेशचे माजी राज्यपाल मा. माता प्रसाद, मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी संस्थेचे अध्यक्ष मा. कृष्णाजी जगदाळे व नामवंत लेखक आणि अमेरिकन उद्योजक मा.ठाणेदार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार **डॉ. वाफारे यांनी शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल जागतिक शिक्षण दिनाच्या दिवशी म्हणजे ५ ऑक्टोबर २०१५ रोजी मुंबई येथे देण्यात आला.** हा पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे विश्वस्त व कार्यकारी संचालक डॉ. सुनील कराड व महाविद्यालयाचे सर्व कर्मचाऱ्यांनी डॉ. वाफारे यांचे अभिनंदन मानले. यानिमित्त डॉ. वाफारे यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




## पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे वस्त्रदान



पारनेर तालुका मित्र मंडळातर्फे नुकतेच चिंचवड येथे मुलांना वस्त्रदान करण्यात आले. या प्रसंगी डावीकडून पारनेर तालुका मित्र मंडळाचे वसतिगृह व्यवस्थापक श्री.संजय जंगम, मा.गिरीश प्रभुणे, शाळेतील मान्यवर शिक्षिका व पारनेर तालुका मित्र मंडळाचे उपाध्यक्ष मधुकर शिरोळे, शाळेतील मुले, आदी उपस्थित होते.

# आपण असे केले तर

❊ **श्रीमती वासंतीबाई किसनराव क्षीरसागर** यांच्या दि. १६.८.२०१५ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे भाचे **प्रा. जगन्नाथ तुकाराम देंडगे**, रा. गांजीभोयरे व **श्री. नामदेव मारुती साबळे**, रा. रुई छत्रपती यांनी मंडळास अनुक्रमे **रु.१०००/- व रू.१,५०१/-** देणगी दिली.



❊ **कै.भगवान काशिनाथ काळे** सर रा. गोरेगाव यांच्या दिनांक १९.१०.२०१५ च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र **श्री.अनिकेत** यांनी **रु.१०००/-** देणगी दिली.



❊ **चि. सोहम** यांच्या दिनांक ४.९.२०१५ च्या वाढदिवसा निमीत्त पिताश्री **श्री.तुकाराम विठ्ठल नरसाळे**, रा. गोरेगाव यांनी मंडळास **रु. १०००/-** देणगी दिली.



❊ **कै. सौ. सुशिला मारुती पोटघन** रा.जातेगाव यांच्या दिनांक १७.०८.२०१५ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.अविनाश** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

❊ **कै. सदाशिव किसन शिंदे व कै. श्रीमती सिंधु सदाशिव शिंदे** रा. सारोळे अडवाई यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र **श्री. विकास व श्री.प्रविण** यांनी प्रत्येकी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.






❊ **कै. श्रीमती लक्ष्मीबाई आश्रुजी आग्रे** रा.पारनेर यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र **श्री. अशोक** यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.

❊ **कै. दत्तात्रय नाना खोसे** रा.पाडळी दर्या यांच्या दि.२०.०२.२०१६ च्या व **कै.भामाबाई दत्तात्रय खोसे** यांच्या दि.१९.०९.२०१५ च्या स्मृतीदिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री.गणेश** यांनी मंडळास **रु.११११/-** देणगी दिली.





❊ **कै. दत्तात्रय रामचंद्र बोरुडे** रा. करंदी यांच्या दिनांक ३०.१२.२०१५ रोजीच्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.बाळासाहेब** यांनी मंडळास **रु.२००१/-** देणगी दिली.



❊ **कै.प्रा. मुकुंद दत्तात्रय वाघमारे** रा. पारनेर यांच्या दिनांक २३.१०.२०१५ च्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या पत्नी **श्रीमती मृदुला** यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



❊ **कै.कृष्णाबाई सुखदेव पोटे**, रा.बाभुळवाडे यांच्या दि.२८.०७.२०१५ च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र **श्री.कुंडलीक सर** यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

❊ **श्री.अरूण शंकरराव देंडगे**, रा.गांजीभोयरे यांनी त्यांची नात **कु.स्वरा श्रीराम देंडगे** हिच्या दि.२९.०९.२०१५ च्या वाढदिवसा- निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.





❊ **डॉ. सुधाकर रामचंद्र खराडे**, रा. निघोज यांनी त्यांच्या दि. ३०.१०.२०१५ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा.कान्हुरपठार यांनी त्यांच्या दिनांक ०१.११.२०१५ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.





❊ **श्री. विजयकुमार गोविंदराव ढुबे**, रा. कान्हुरपठार यांनी त्यांचे सुपुत्र **चि. श्रेयस** याच्या दिनांक २९.११.२०१५ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❊ **श्री. राजेंद्र खंडू थोरात**, रा. पाडळी आळे यांनी त्यांचे पिताश्री **कै.खंडू गेणू थोरात** यांचे दि. ११.११.२०१५ चे स्मृतीदिना निमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.





**श्री.श्रीकृष्ण तुळशीदास जोशी**, रा.कान्हुर पठार यांनी त्यांच्या २५.०९.२०१५ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.५००१/-** देणगी दिली.

**श्री. शंकर हारकू बर्वे** रा.वासुंदे यांनी त्यांची सुकन्या कु.काजल हिच्या दि.०६.१२.२०१५ च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



## नांदा सौख्य भरे

❋ श्री. उत्तम किसन झरेकर, रा. कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.स्वप्निल** व मा.आमदार संगिताताई ठोंबरे यांची भाची व श्री.विष्णु यशवंत लाड रा.पुणे यांची सुकन्या **सौ.कोमल** यांचा शुभविवाह **दि.१३.०२.२०१५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.झरेकर यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

❋ श्री. पोपट किसन आंधळे, रा. कर्जुले हरेश्वर यांची सुकन्या **सौ.प्रियांका** व श्री. अंकश सहादू गवळी, रा.बाबुर्डी यांचे सुपुत्र **चि.उमेश** यांचा शुभविवाह **दि.२७.११.२०१५** रोजी संपन्न झाला.

## निधन वार्ता



❋ सामाजिक कार्यकर्ते, **नारायण बबन एरंडे,** वय ८७ वर्षे, रा. वडझिरे यांचे दि.२६.०८.२०१५ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक रामचंद्र उर्फ रामा एरंडे यांनी मंडळास **रू.११०००/-** देणगी दिली.



❋ **भिकाजी सुखदेव चितळकर,** वय ८१ वर्षे, रा.रायतळे यांचे दि.०९.०८.२०१५ रोजी निधन झाले. ते रेल्वेमधून सेवानिवृत्त झाले होते. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र, प्रा.भगवान यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **सौ.सुरेखा सुरेश लोंढे,** वय ७२ वर्षे, रा. कान्हुर पठार यांचे दि.०१.१०.२०१५ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र, श्री. सुधीर यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❋ **श्रीमती उषाताई भास्करराव पाटील,** वय ८५ वर्षे, रा. वासुंदे यांचे दि.०५.१०.२०१५ रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे सुपूत्र, श्री. सुनील यांनी मंडळास **रू.१५००/-** देणगी दिली.



❋ **गोपाळराव सबाजी ढुबे,** वय ५९ वर्षे, रा.कान्हुर पठार यांचे दि.१८.१०.२०१५ रोजी निधन झाले. ते पोलीस विभागातून जिल्हा पोलीस उपअधिक्षक या पदावरून सेवानिवृत्त झाले होते.

पान क्र.५ वरून...

# पारनेर स्नेह मेळावा कार्यक्रम वृत्तांत

श्री.हौसाराम घोडके यांना १०० वर्षे आयुष्य लाभो अशी सद्भावना त्यांनी व्यक्त केली.

सध्या दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे तालुक्यात जनावरांना चारापाणी व माणसांना पाणी हे प्रश्न खूप बिकट बनलेले आहेत. नजीकच्या १ महिन्यात जोरदार पाऊस झाला नाही तर वाळवंटी परिस्थितीला सामना करावा लागेल. हा ज्वलंत प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हे मंडळ माझे आहे व मी मंडळास मदत करणे माझे कर्तव्य आहे हे त्यांनी मुद्दाम नमूद केले.

सत्कारार्थी ग्रामस्थांची यादी वाचन सांगताना प्रा. सुनील राजे निंबाळकर म्हणाले, **''फांदीवर बसलेल्या पक्ष्याला फांदी तुटण्याची भिती वाटत नाही. कारण त्याचा विश्वास फांदीवर नसून स्वतःच्या पंखावर असतो.''** त्याप्रमाणे पारनेरकरांना बाहेर पडल्यावर त्यांचा विश्वास कार्यकर्तृत्वावर असल्याने त्यांना भिती वाटत नाही. **संगीतातील गाण्याला राग म्हणतात, विषारी सापाला नाग म्हणतात तर पारनेर जनतेला वाघ म्हणतात** असे किंबहूना यापेक्षाही सरस भाषेत पारनेरकरवासियांचे कौतुक केले. त्यानंतर मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी **श्री.भाऊसाहेब नरड सर** यांनी समर्थपणे सांभाळली. तसेच आभारही त्यांनीच मांडले. या कार्यक्रमासाठी सर्व कार्यकारणी मंडळ उपस्थित होते. कार्यक्रम समाप्तीनंतर मंडळातर्फेआयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा आस्वाद सर्वांनी घेतला.

**शब्दांकन - भाऊसाहेब नरड**

**टिप :- सदर कार्यक्रमाचे सर्व फोटो पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.**

# जमाखर्च आयुष्याचा



आपल्यापैकी सर्वांचेच आयुष्य मर्यादित आहे. जीवनाचा जेव्हा शेवट होईल तेव्हा येथील कुठलीच गोष्ट आपल्याबरोबर नेता येणार नाही. मग जीवनात खूप काटकसर कशासाठी करायची? आवश्यक आहे तो खर्च केलाच पाहिजे. ज्या गोष्टीतून आनंद मिळतो त्या गोष्टीही केल्या पाहिजेत. शक्य असेल तेवढा दानधर्मही करायला हवा. मुलांसाठी किंवा नातवंडासाठी संपत्ती गोळा करून साठवून ठेवायची गरज नाही. तसे केले तर पुढची काही वर्षे स्वतः काही न करता ते नुसते बसून खातील व आपल्या मृत्यूची वाट पाहतील.

आपण गेल्यानंतर काय होणार याची चिंता करू नका. कारण आपला देह जेव्हा मातीत मिसळून जाईल तेव्हा कोणी आपले कौतुक केले काय किंवा टिका केली काय? सर्व सारखेच. जीवनाचा आणि स्वकष्टाने मिळविलेल्या पैशाचा आनंद घेण्याची वेळ निघून गेल्यानंतर त्या संपत्तीचा काय उपयोग? मुलांची खुप काळजी करू नका. त्यांना स्वतःचा मार्ग निवडू द्या. त्यांची काळजी घ्या. त्यांना भेटवस्तूही द्या. पण हे सर्व करूनसुद्धा काही खर्च स्वतःच्या आवडीनिवडीवर करा. जन्मापासून मृत्यूपर्यंत नुसते राबराब राबणे म्हणजे आयुष्य नाही, हे देखील लक्षात ठेवा. तुम्ही कदाचीत आत्ता चाळीसीत, पन्नाशीत किंवा साठीत असाल. आरोग्याची हेळसांड करून पैसे कमावण्याचे दिवस आता संपलेले असतात. पुढील काळात पैसे मोजूनसुद्धा चांगले आरोग्य मिळणार नाही. या वयात प्रत्येकापुढे दोन महत्वाचे प्रश्न असतात. पैसा कमावणे कधी थांबवायचे आणि किती पैसा आपल्याला पुरेल? **तुमच्याकडे शेकडो एकर सुपीक शेतजमीन असली तरी तुम्हास दररोज किती अन्नधान्य लागते? तुमच्याकडे अनेक घरे असली तरी रात्री झोपण्याकरीता एक खोली पुरेशी असते.**

एक दिवस आनंदाशिवाय गेला तर आयुष्यातील एक दिवस तुम्ही गमावला आहात. एक दिवस आनंदात गेला तर आयुष्यातला एक दिवस तुम्ही कमावला आहात, हे लक्षात असू द्या. आणखी एक गोष्ट, तुमचा स्वभाव खेळकर, उमदा असेल तरच तुम्ही कोणत्याही आजारातून लवकर बरे व्हाल. तुम्ही कायम प्रफुल्लीत असाल तर तुम्ही शक्य तो आजारीच पडणार नाहीत. सगळ्यात महत्वाचे म्हणजे आजुबाजुला जे जे उत्तम आहे, उदात्त आहे, त्याकडे पहा. त्याची जपणूक करा. आणि हो! तुमच्या मित्रांना कधी विसरू नका. त्यांना जपा. हे जर तुम्हास जमले तर तुम्ही मनाने कायम तरूण राहाल. आणि इतरांना हवेहवेसे वाटाल. मित्र परिवार नसेल तर तुम्ही नक्कीच एकटे आणि एकाकी पडाल.

**संकलन - गुलाबराव मातेरे**

## सेवानिवृत्ती



❊ **श्री. रमेश सावित्रा नाईक**, रा. **नारायण गव्हाण** हे टाटा मोटर्स कंपनीमधून **दि.३०.०५.२०१५** रोजी ३५ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले.



❊ **श्री.आप्पासाहेब भिकाजी पानमंद,** रा.गोरेगाव हे महाराष्ट्र सरकारच्या नोंदणी व मुद्रांक विभागातून सहनिबंधक या पदावरून ३७ वर्षाच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१५** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

❊ **श्री. अशोक चांगदेव नगरे,** रा. पारनेर हे केंद्र सरकारच्या सेंट्रल एक्साईजच्या कस्टम व सर्व्हिस टॅक्स या विभागातून असिस्टंट कमिशनर या पदावरून **दि.३०.०६.२०१५** रोजी ३४ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.




❊ पारनेर तालुका मित्र मंडळाचे कार्यकारणी सदस्य, **श्री.भाऊसाहेब गंगाराम नरड सर,** रा.**कासारे** हे भारत इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे या संस्थेतून उपप्राचार्य या पदावरून **दि.३१.०८.२०१५** रोजी ३३ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. नोकरीच्या कालावधीत त्यांना 'आदर्श शिक्षक' या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



❊ **श्री. भास्कर बाबुराव चेमटे,** रा.वासुंदे हे केंद्र सरकारच्या बी.एस.एन.एल. या विभागातून ३२ वर्षे ७ महिन्याच्या सेवेनंतर **दि.०१.११.२०१५** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२७००/-** देणगी दिली.

पाण्याचा वापर जपून करा!




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.



संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
५, पिंकरोज अपार्टमेंट, विद्यासागर कॉलनी,
सॅलीसबरी पार्क, पुणे - ४११ ०३७.
फोन - २४२६३३५८, मो.- ९४२२०२६२२५

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
कार्याध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.बाजीराव झुंजारराव जगदाळे व मुद्रक श्री. सुनील तोटे (suniltote11@gmail.com) (Cell : 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून 'पारनेर भवन', मंगलनगर, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३ येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________